# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
## मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालय

क्र.आअ/ ५७२ /मुदेमनेरु दि. १५.०७.२०२५

**स्वारस्य अभिव्यक्ती**

**विषयः मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालय येथे रुग्णांना मानसेवी तत्वावर नेत्ररोग सेवा प्रदान करण्यासाठी इच्छुक नेत्र शल्यचिकित्सकांकडून स्वारस्य अभिव्यक्ती मागविणे.**

मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालय हे डोळ्यांशी संबंधित आजार असलेल्या रुग्णांना उपचार देण्यासाठी एक विशेष रुग्णालय आहे. माननीय महानगरपालिका आयुक्तांच्या दिनांक २६.०६.२०२५ रोजीच्या मंजुरीनुसार, मानसेवी नेत्र शल्यचिकित्सक ०१ पदे, मानसेवी सहाय्यक नेत्र शल्यचिकित्सक ०३ पदे कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी इच्छुक पात्र नेत्र शल्यचिकित्सकांकडून खाली नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हता,अनुभव,मासिक मानधन व विहीत अटी आणि शर्तीसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पदांचा तपशील**

**(पदाचा कार्यकालः १६.०८.२०२५ ते ३१.०३.२०२७)**

**(कंत्राटी तत्वावर दर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड)**

| पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| मानसेवी नेत्रशल्यचिकित्सक | १ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान मान्यताप्राप्त विद्यापीठातून एमएस/डीएनबी (नेत्ररोग) | १. पदवीनंतर १० वर्षापेक्षा जास्त अनुभव.<br>२. सरकारी/निमसरकारी किंवा महानगरपालिका रुग्णालयात मानसेवी/सल्लागार म्हणून नेत्ररोग तज्ञ सेवा प्रदान करण्याचा अनुभव. |
| मानसेवी सहाय्यक नेत्रशल्यचिकित्सक | ३ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान मान्यताप्राप्त विद्यापीठातून एमएस/डीएनबी (नेत्ररोग) | १. पदवीनंतर ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव.<br>२. सरकारी/निमसरकारी किंवा महानगरपालिका रुग्णालयात मानसेवी/सल्लागार म्हणून नेत्ररोग तज्ञ सेवा प्रदान करण्याचा अनुभव. |

★ **महत्त्वाच्या सूचनाः**

१) वरिष्ठ असलेल्या तीन अर्जदारांना युनिट प्रमुख पद दिले जाईल.

२) सर्वात वरिष्ठ अर्जदाराला मानसेवी नेत्र शल्यचिकित्सक आणि इतरांना मानसेवी सहाय्यक नेत्र शल्यचिकित्सक म्हणून पद दिले जाईल.

३) जेष्ठ व अनुभवी तसेच एमएस/डीएनबी पदवीनंतर १ वर्षापेक्षा जास्त काळ मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालयात काम केलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.

**अर्ज प्रक्रिया** :

१) अर्जदाराने अर्ज प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रतीसहीत रूग्णालयाच्या कार्यालयात दि.१५.०७.२०२५ ते दि.२५.०७.२०२५ सोमवार ते शुक्रवार (सार्वजनिक सुट्ट्या वगळून) सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावे .

२) कार्यालयातून चलन घेऊन अर्जाचे शुल्क रू.७९०/- + १८% GST महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात (CFC) रोखीत भरावे व शुल्क भरल्याची पावती विहीत कालावधीत सादर करावी.

**प्रमाणपत्रे** :

१) एमएस/डीएनबी (नेत्ररोग) पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्रे व प्रयत्न प्रमाणपत्रे

२) वैध एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र

३) अनुभव प्रमाणपत्र

४) आधार कार्ड आणि पॅन कार्डची प्रत

५) प्रोफेशनल इंडेनमिटी (Professional Indemnity) बॉंडची प्रत

**वेतन** : परिपत्रक संचालक/एमई आणि एमएच/ ८२३३ दिनांक २५.०३.२०१४ नुसार दरमहा रु. १०,०००/.

**नियम आणि अटी:**

१.नियुक्त केलेल्या दिवसांनुसार, सुट्टीचा दिवस आणि रविवार वगळता प्रत्येक कामकाजाच्या दिवशी किमान ४ तास काम करावे लागेल. सुट्टीचा दिवस रुग्णालय प्रमुख ठरवतील.

२.मानसेवी तज्ञ मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभाग, ऑपरेशन थिएटर आणि अंतर्गत रुग्ण विभागात रुग्णांना उपचार देतील.

३.मानसेवी तज्ञ त्यांच्या अंतर्गत काम करणा-या आवास/ निवासी वैद्यकीय अधिका-यांना प्रशिक्षण देतील.

४.युनिट अंतर्गत होणारे सर्व उपचार व शस्त्रक्रिया यासाठी सर्वस्वी युनिट प्रमुख मानसेवी तज्ञ जबाबदार राहतील.

५.मानसेवी तज्ञ त्यांच्या कर्तव्याच्या दिवशी हजेरीपत्रावर स्वाक्षरी करतील.

६.क्र.संचालक/एमई आणि एमएच/८२३३दिनांक २५.०३.२०१४ च्या परिपत्रकानुसार मानधन दिले जाईल.

७.त्यांच्या सेवेच्या कालावधीत रजा अनूज्ञेय नाही.

८.मानसेवी तज्ञाची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दि.१६.०८.२०२५ ते दि.३१.०३.२०२७ पर्यंत कंत्राटी तत्वावर दर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन नियुक्ती करण्यात येईल.

९.नियुक्त झालेला मानसेवी तज्ञ बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयात एकापेक्षा जास्त पदांवर राहू शकत नाही.

१०.उमेदवारांची पदावरिल नियुक्ती भविष्यात कोणत्याही परिस्थितीमध्ये नियमित करण्यात येणार नाही. तसेच महानगरपालिका नियमित कर्मचा-यांना लागू होणारे बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमन लागू होणार नाहीत आणि त्यासाठी ते न्यायालयात जाऊ शकत नाहीत.

११.कंत्राटी तत्वावरची नियुक्ती आवश्यकता नसल्यास कुठल्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.

१२.उमेदवारांच्या नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी पदधारकाने चुकीची माहीती प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याने किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास तसेच कामगिरी असमाधानकारक आढळल्यास त्यांची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

१३.नियुक्त झालेल्या मानसेवी अधिका-यांना नोंदणीकृत ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर अटी आणि शर्तींचे हमीपत्र सादर करावे लागेल अन्यथा त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

१४.मानसेवी तज्ञला कुठल्याही कारणास्तव पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने एक महिना आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

१५.पात्र उमेदवारांची नियुक्ती न झाल्यास त्यांची प्रतिक्षायादी तयार करुन सदर प्रतिक्षायादी दोन वर्षाच्या कालावधी करता ग्राह्य धरण्यात येईल व नियुक्त झालेला कंत्राटी मानसेवी तज्ञाने राजीनामा दिल्यास, सेवा सोडुन गेल्यास यादीमध्ये उपलब्ध असलेल्या पुढील उमेदवारास नियुक्त करण्यास येईल.

**सही /-**

**प्रमुख वैद्यकिय अधिकारी**

**मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रूग्णालय**